## २रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, भूम

नि.दि.दा.क्र.४७४/२०२३
भागवत विरुध्द अनिल
**निशाणी क्र.१५ खाली**

**वादीतर्फे साक्षीदार क्र.१ चा उलटतपास प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. व्ही.डी.पवार यांचेमार्फत शपथेवर सुरु–**

**१२.** आम्ही चार भाऊ व एक बहिण असे भावंड आहोत. बबन हा माझा सर्वात मोठा भाऊ आहे. बबन, प्रभाकर व वसंत हे तिघे देखील मयत आहेत. बबन यास चार मुले आहेत. वसंत यास दोन मुले व एक मुलगी आहे व प्रभाकर यास पाच मुली आहेत व मला दोन मुले व एक मुलगी आहे. मी सन १९७४ पासून पुणे येथे राहतो. तेथे मी माथडी कामगार म्हणून काम करतो. हे म्हणणे खरे नाही की, पाथरुड येथे मी महत्त्वाच्या वेळेसच येतो. प्रभाकर देखील बाहेरगावी त्याच्या कुटुंबासाहेबत राहत असे. पाथरुड येथे बबन व वसंत हे राहत होते. दाव्यातील जमीनीचा गट नं.३७ असुन त्याचे क्षेत्र हे १३.५० आर इतके आहे. त्याच्या चतुःसिमा पूर्वेस– दशरथ बोराडे व लक्ष्मण बोराडे, पश्चीमेस– शोभा धोंडीबा धर्माधिकारी, दक्षीणेस– वसंत व माझी स्वतःची व उत्तरेस– माणिक दिगंबर धर्माधिकारी यांच्या जमीनी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, गट नं.३७ मधील जमीन ही पूर्वी वडीलांच्या नावावर होती. हे म्हणणे खरे आहे की, सदरची जमीन ही न्यायालयामध्ये दावा दाखल करुन वाटणी करुन घेतली होती. हे म्हणणे खरे आहे की, वाटून घेतल्याप्रमाणे जमीनीची वहिवाट आम्ही करत होतो. हे म्हणणे खरे आहे की, वाटणीप्रमाणे जमीनीचे तीन तुकडे करण्यात आले होते. वाटणीप्रमाणे वसंतला ०.१३ आर, मला व बबनला प्रत्येकी १३.५० आर असे क्षेत्र वाटून देण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की, तिन्ही तुकडयांच्या चतुःसिमा हया

वेगवेगळया आहेत. हे म्हणणे खरे आहे की, यापूर्वी सांगीतलेल्या चतुःसिमा हया गट नं.३७ च्या पूर्ण क्षेत्राच्या चतुःसिमा आहेत. माझ्या वाटणीस आलेल्या क्षेत्राच्या चतुःसिमा हया पूर्वेस– अनिल व वसंत धर्माधिकारी, पश्चीमेस– शोभा धोंडीबा धर्माधिकारी, दक्षीणेस– माझी व अनिल धर्माधिकारी व उत्तरेस– माणिक दिगंबर धर्माधिकारी याप्रमाणे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या भावाची मुले अनिल व प्रमोद ही चांगली कमावती आहेत. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी बबन, वसंत व भागवत यांनी खरेदीखत क्र.११३९/२०११ प्रमाणे ४० आर जमीन विकत घेतली होती. हे म्हणणे खरे आहे की, त्याप्रमाणे खरेदीखत झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, खरेदीखताप्रमाणे ९०,०००/– रुपये देण्यात आले होते. हे म्हणणे खरे आहे की, खरेदीखत करतेवेळी अनिल, बबन, वसंत, भागवत व साक्षीदार सुरेश व माणिक सोनारभट हे हजर होते. हे म्हणणे खरे आहे की, सदरच्या खरेदीखतावर माझ्या भावांनी व साक्षीदारांनी सहया केल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, खरेदी करतेवेळी सर्व मजकुर हा वाचून पाहिला होता. बबनचे शिक्षण किती झाले मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, साक्षीदार सुरेश दुधाळ व माणिक सोनारभट यांचे माझे चांगले संबंध आहेत. हे म्हणणे खरे आहे की, पाथरुडमध्ये मला कोणतीही अडचण आल्यास माणिक सोनारभट मला मदत करतात. हे म्हणणे खरे नाही की, माणिक सोनारभट व अनिल यांचे जमत नसल्यामुळे त्यांचे सांगण्यावरुन न्यायालयात हा खोटा दावा दाखल केला आहे. सुरेश दुधाळ व माझे कोणतेही वैर नाही. त्याच्यासोबत माझे चांगले संबंध आहेत. मी सुधाकर धर्माधिकारी यास ओळखतो. त्याचे व माझे चांगले संबंध आहेत. हे म्हणणे खरे नाही की, खरेदीखत झाल्यानंतर सुधाकर यास आम्ही खरेदीखताचा फेरफार आव्हानीत करायला सांगीतले होते. तहसिलदारने सुधाकरच्या विरोधात जाऊन खरेदीखताचा फेरफार मंजूर

करण्यात आला होता किंवा कसे, याविषयी मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, खरेदीखतामधील चतुःसिमा या पूर्वेस– लक्ष्मण देवराव बोराडे, पश्चीमेस– शोभा धोंडीबा सोनारभट, दक्षीणेस– वसंत दत्तात्रय सोनारभट व उत्तरेस– माणिक सोनारभट याप्रमाणे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, या चतुःसिमेमधील जमीन ही प्रतिवादी अनिल याने विकत घेतली होती.

**१३.** हे म्हणणे खरे आहे की, अनिल याने जमीन विकत घेतल्यापासून दुसऱ्या गटातील विहिरीतून या जमीनीसाठी पाईपलाईन केली आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरच्या विहिरीतील पाण्याचा उपयोग करुन अनिल त्याच्या जमीनीत पिक घेत आहे. हे म्हणणे खरे नाही की, अनिल याने जमीन विकत घेतल्यानंतर मशागत करुन बागायत केली आहे. अनिल याने माझी दिशाभूल करुन, कुलमुख्यत्यारपत्र तयार करुन जमीन खरेदी केली हे माझ्या दाव्यामध्ये नमूद केलेले आहे, ते मला सन २०२० साली समजले. खरेदी झाल्यानंतर एक वर्षाच्या आत मी, अनिल यास दिशाभूल करण्याबाबत काही विचारले नव्हते. सन २०२० साली मला कळाल्यानंतर लॉकडाऊनमुळे मी दावा दाखल केला नाही. सन २०२० मध्ये मला कोणत्या महिन्यात माहिती झाले हे सांगता येणार नाही. दावा दाखल करण्यापूर्वी माझ्या भावांच्या मुलासोबत माझी कोणतीही चर्चा झाली नाही. हे म्हणणे खरे आहे की, खरेदीखताबाबत बबनच्या मुलांनादेखील माहिती आहे. हे म्हणणे खरे नाही की, खरेदीखत झाल्यापासून बबनची मुले दावामिळकतीकडे आली होती.

**१४.** हे म्हणणे खरे नाही की, माझ्या दाव्यातील परिच्छेद क्र.५ पासून लिहलेला सर्व मजकुर व पुराव्याच्या शपथपत्रातील परिच्छेद क्र.४ पासून लिहलेला सर्व मजकुर खोटा लिहला आहे. हे म्हणणे खरे नाही की, अनिल याने खरेदीखताप्रमाणे ९०,०००/– रु.

आम्हाला देऊन खरेदीखतामधील मिळकत ही विकत घेतली आहे व त्याप्रमाणे तो जमीनीचा मालक व वहिवाटदार झालेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, अनिल याने आमची कसलीही दिशाभूल केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, सध्या वादमिळकतीचा ताबा हा आमच्याकडे आहे असे मी खोटे लिहले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या दाव्यातील मजकुर "माझ्याकडून आणि माझ्या दोन भावाकडून प्रतिवादी यांनी फसवून, खोटे सांगून व पोकळ खरेदीखत करुन घेतले आहे" हे मी खोटे लिहले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या दाव्यातील परिच्छेद ८ मधील लिहलेला मजकुर "मी २०२३ साली गुढीपाडव्याच्या दिवशी गावी पाथरुड येथे आलो व प्रतिवादीने आडव्या वाटण्या उभ्या करण्याबाबतचा विचार माझ्याजवळ बोलून दाखवला व वाद घातला, त्यानंतर मिळकतीच्या फेरफार नोंदीची नक्कल पाहिली असता तेव्हा खरेदीखत क्र.११३९/२०११ प्रमाणे नोंद झाली असल्याचे निदर्शनास आले" हे मी खोटे लिहले आहे. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १४.०५.२०२३ रोजी दावा दाखल करण्याचे कारण घडल्याचे मी खोटे लिहले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटे पुराव्याचे शपथपत्र दाखल करुन आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत

MATE ASHLESHA SOUDAGAR

Digitally signed by MATE ASHLESHA SOUDAGAR
Date: 2025.11.12 15:05:42 +0530

दिनांक १२.११.२०२५

**(श्रीमती अश्लेषा एस. मते)**
२रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
भूम.